क्र.मासं/रवका/न.क्र.३४८/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ३६१ दिनांक १३ / १० / २०११

विषय : मा.विधानमंडळ सदस्यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या तालुका समन्वय/सल्लागार/सनियंत्रण समितीच्या बैठकांना सर्व निमंत्रित अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणेबाबत.

संदर्भ : शासनाचे मुख्य सचिव यांचे सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०११/प्र.क्र.८४/१८ (रवका) दि.२४ ऑगस्ट २०११.

.....

संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने शासनाचे मुख्य सचिव यांचे सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०११/प्र.क्र.८४/१८ (रवका) दि.२४ ऑगस्ट २०११ ची प्रत सोबत जोडली आहे.

२. सदर शासन परिपत्रकान्वये असे निर्देश देण्यात आले आहेत की, मा.विधानमंडळ सदस्यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या तालुका समन्वय/सल्लागार/सनियंत्रण इत्यादी समित्यांच्या बैठकांना सर्व निमंत्रित अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात यावा आणि जे अधिकारी सदर बैठकांना वारंवार अनुपस्थित राहतील त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

३. सर्व संबंधितांना विनंती की उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून नमूद सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

13/10/2011
(विजय भि. बागुल)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

D:\O&M\Adm Cir.F.N.348.doc
13/10/2011

मा: विधानमंडळ सदस्यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या तालुका समन्वय/ सल्लागार/सनियंत्रण समितीच्या बैठका नियमितपणे घेण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०११/प्र.क्र.८४/१८(र व का)
सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०००३२
दिनांक - २४ ऑगस्ट,२०११

वाचा :- शासन परिपत्रक क्र. सा.प्रवि.क्र. संकीर्ण-२०१०/प्र.क्र.१२८/१०/१८ (र व का)
दिनांक १० मे,२०११ व दिनांक ८ ऑगस्ट,२०११

## शासन परिपत्रक

मा.विधानमंडळ सदस्यांच्या अध्यक्षतेखाली तालुका समन्वय/ सल्लागार/ सनियंत्रण समित्या गठीत केलेल्या आहेत. या समित्या वेगवेगळया विभागांच्या अखत्यारित येतात. या समित्यांच्या नियमितपणे बैठका घेण्यात येत नाहीत व या बैठकांना सर्व निमंत्रित उपस्थित रहात नाहीत असे निदर्शनास आले आहे. तसेच मा. विधानमंडळ सदस्यांनी देखील याबाबत वेळोवेळी नाराजी व्यक्त केली आहे.

त्यामुळे सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे निर्देश देण्यात येत आहे की, मा.विधानमंडळ सदस्यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या तालुका समन्वय/ सल्लागार/ सनियंत्रण इत्यादी समित्यांच्या बैठका नियमितपणे आयोजित करण्यात याव्यात. तसेच सदर बैठकांना सर्व निमंत्रित अधिका-यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. जे अधिकारी वेळेवर बैठका आयोजित करणार नाहीत अथवा बैठकांना वारंवार अनुपस्थित राहतील त्यांच्याविरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. यासंदर्भात संबंधित प्रशासकीय विभागांनी वेळोवेळी आढावा घ्यावा.

सदर आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.

(रत्नाकर गायकवाड)
मुख्य सचिव

प्रति,

विधानसभा सदस्य/ विधान परिषद सदस्य